<u>कोकण ग्रामीण पर्यटन विकास कार्यक्रम .</u>
रत्नागिरी जिल्हयातील समुद्रकिनारा सुरक्षेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी आवश्यक निधीस प्रशासकीय मान्यता देवून निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः कोपवि- २०१७/प्र.क्र.१७१ /योजना -६
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : १८ सप्टेंबर, २०१७

<u>वाचा</u> :-

१) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शासन निर्णय क्र.टीडीसी-२००६/३/प्र.क्र.६/पर्यटन, दि.८.९.२००६
२) ग्राम विकास विभाग,शासन निर्णय क्र.व्हीपीएम-२०१६/प्र.क.३२०/पंरा-३ दि.३.८.२०१७

<u>प्रस्तावना</u> : -

महाराष्ट्रातील सागर किनाऱ्यावर येणारे पर्यटक समुद्राच्या पाण्यात बुडून मृत्यु पावल्याच्या दुर्देवी घटना घडल्या आहेत. या घटनाच्या पार्श्वभुमीवर मा.उच्च न्यायालयामध्ये जनहित याचिका क्र.८९/२०१० दाखल करण्यात आली होती. सदर जनहित याचिकेमध्ये शासनातर्फे मा.मुख्य सचिव तसेच मा.प्रधान सचिव, पर्यटन यांच्यावतीने शपथपत्र दाखल करण्यात आलेले असून शासनाच्या पर्यटन विभागाकडील दि.८.९.२००६ च्या शासन निर्णयानुसार सर्व समुद्र किनाऱ्यावर सुरक्षिततेच्या उपाय योजना करण्याची हमी देण्यात आली आहे. त्यानुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद रत्नागिरी यांनी समुद्रकिनाऱ्यावरील सुरक्षेसाठी सादर केलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या प्रस्तावास मंजुरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

कोकण ग्रामीण पर्यटन विकास कार्यक्रमांतर्गत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद रत्नागिरी यांच्या कार्यालयाने त्यांच्या दि.२०.७.२०१७ च्या पत्रान्वये सादर केलेल्या समुद्र किनाऱ्यावरील सुरक्षेकरिता अतिरिक्त उपाययोजना करण्यासाठीच्या प्रकल्प प्रस्तावांना/विकास आराखडयांना अनुसरुन खालील यादीत नमूद केलेल्या कामांना शासनाची प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	आवश्यक बाबींचा/साहित्याचा तपशिल	आवश्यक नग	प्रति नग किंमत रक्कम रू.	आवश्यक एकुण रक्कम रू.
१	गणपतीपुळे- लाईफ जॅकेट्स	२५०	१,७५०/-	४,३७,५००/-
२	१)वेळणेश्वर,ता.गुहागर, २) ग्रा.पं.कर्दे, ता.दापोली ३) लाडघर,ता.दापोली ४) आरे, ता.रत्नागिरी- प्रति किनारा ५० लाईफ जॅकेट्स १) मुरूड ता.दापोली २) भाटये ता.रत्नागिरी - प्रति किनारा १०० लाईफ जॅकेट्स	४००	१,७५०/-	७,००,०००/-
३	भाटये व गणपतीपुळे समुदकिनारा येथे अतिरिक्त वॉच टॉवर व वॉच केबीन	२	२,१५,०००/-	४,३०,०००/-
४	आरे व लाडघर समुद्रकिनारा- वॉच टॉवर व वॉच केबीन	२	२,१५,०००/-	४,३०,०००/-
५	आरे व लाडघर समुद्रकिनारा शोध व बचाव साहित्य प्रति बीच (लाईफ जॅकेट्स- १०, लाईफ बोये-१०, मेगा फोन-१, बी.ओ.बी.रोप १२ एम.एम.- १०० मीटर,गॉगल्स-५,वूलन ब्लँकेट्स-५,बायनॅकूलर्स-२,व्हिसल्स-५, इलेक्ट्रीकल वॉल माऊंटन सायरन-१, सर्चलाईट हॅलोजन-२, फायबर स्ट्रेचर-१ इत्यादी)	२ समुद्र किनारे	१,४४,०००/-	२,८८,०००/-
६	गणपतीपुळे समुद्रकिनारा -मो-बाईक	१	५,९०,०००/-	५,९०,०००/-
७	गणपतीपुळे - जेट स्की विथ ट्रॉली	१	१३,००,०००/-	१३,००,०००/-

८	१)भाटये २)गणेशगुळे ३)गणपतीपुळे ४)गावखडी ५) भंडारपुळे (नेवरे ग्रा.पं) ६)मालगुंड ७) वेळणेश्वर ८) हर्णे ९)मुरूड १०)दाभोळ ११) माडबण १२)जैतापूर १३)मुसाकाजी (नाटे ग्रा.पं) १४) लाडघर १५) आरे (काळबादेवी ग्रा.पं) १६) कर्दे या समुद्रकिनाऱ्यावर			
	अ) प्रत्येकी १ रेस्क्यू सर्फ बोर्ड	१६	४५,०००/-	७,२०,०००/-
	ब) प्रत्येकी २ रेस्क्यू टयुब	३२	८,०००/-	२,५६,०००/-
	क) प्रत्येकी १ बीच वॉच चेअर	१६	६,०००/-	९६,०००/-
	ड) प्रत्येकी ६ व गणपतीपुळे समुद्रकिनारा येथे १५ असे एकूण १०५ बीच सेफ्टी फ्लॅग विथ बोर्डस्	१०५	१,५००/-	१,५७,५००/-
१२	एकूण आवश्यक निधी **(चौपन्न लाख पाच हजार रू.)**			**५४,०५,०००/-**

२. कोकण ग्रामीण पर्यटन विकास कार्यक्रम व समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांसाठी सुरक्षा व्यवस्था करणे यांचा परस्पर पुरक संबंध विचारात घेता एक विशेष बाब म्हणून वरील बाबींसाठी कोकण ग्रामीण पर्यटन विकास कार्यक्रमाच्या लेखाशिर्ष (२५१५ २४३२) अंतर्गत अर्थसंकल्पीय तरतुदीतून वर नमूद केल्याप्रमाणे एकूण रू.५४.०५ लाख (चौपन्न लाख पाच हचार रूपये फक्त) निधी वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

३. ही मंजुरी वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-१०.०८/प्र.क्र.७०/विनियम, दि.१५.०५.२००९ अन्वये प्रसिध्द केलेल्या वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग - पहिला, उप-विभाग-तीन मधील अनुक्रमांक ४ येथील परिच्छेद क्र. २७ (२) नुसार प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरुन देण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०९१६११३५४७९५२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Manoj D Jadhav

Digitally signed by Manoj D Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RDD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a83fc829949e9b1a022b031436c946028b48d51f5a1bf36ca3ce4fead857da72, cn=Manoj D Jadhav
Date: 2017.09.19 15:16:01 +05'30'

(मनोज जाधव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधान परिषद/ विधानसभा,मुंबई.
२. प्रधान सचिव, पर्यटन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. विभागीय आयुक्त,कोकण विभाग,कोकण भवन, नवी मुंबई
४. मुख्य वास्तुविशारद, सां.बां.वि., बांधकाम भवन, मुंबई.
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र -१,मुंबई.
६. महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई.
७. व्यवस्थापकिय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई
८. जिल्हाधिकारी, रत्नागिरी.
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी.
१०. उप सचिव, पर्यटन,मंत्रालय,मुंबई.
११. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी.
१२. मा. मंत्री, ग्राम विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
१३. मा. राज्यमंत्री, ग्राम विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
१४. कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम, रत्नागिरी.
१५. जिल्हा कोषागार अधिकारी, , रत्नागिरी.
१६. निवड नस्ती, कार्यासन योजना-६.